**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies**
Online ISSN 2278-8808, SJIF 2024 = 8.153
https://www.srjis.com/issues_data/239
Peer Reviewed & Refereed Journal, SEPT-OCT 2024, Vol- 13/85

# संकरित अध्यापनाबाबत प्राथमिक शाळेतील शिक्षकांची जागरूकता व दृष्टीकोनाचा अभ्यास

**शेख इकबाल रहेमतुल्ला**

*पीएच. डी. संशोधक विद्यार्थी, शिक्षणशास्त्र विभाग, मुंबई विद्यापीठ*

*Email- shaikiqbal2006@gmail.com*

**डॉ. सुनिता मगरे**

*संशोधन मार्गदर्शिका, प्राध्यापक व विभागप्रमुख, शिक्षणशास्त्र विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई.*

*Email- sunita.magre@gmail.com*

**Paper Received On**: 20 SEPT 2024
**Peer Reviewed On:** 24 OCT 2024
**Published On:** 01 NOV 2024

*Abstract*

*"गुरू गोविंद दोनो खडे के लागूँ पाय*
*बलिहारी गुरू अपने जिन गोविंद दियो बनाय"*

*गुरू आणि परमेश्वर माझ्यापुढे उभे आहेत मी सर्वात प्रथम कोणाच्या पाया पडू सर्वात प्रथम मी गुरुच्या पाया पडतो. कारण परमेश्वर प्राप्तीसाठी आवश्यक मार्गदर्शन मला गुरूकडून मिळाले शिक्षण मानवाचा तिसरा डोळा आहे. शिक्षण प्रकियेत शिक्षकाची भूमिका महत्वाची असते. संकरित अध्यापनाचावत शिक्षकांची जागरूकता व दृष्टीकोनाचा विद्यार्थी विकासावर परिणाम होत असतो. शिक्षकांना संकरित अध्यापन पध्दती संपादनाची संधी दिली व त्यांच्या जोडीला समृध्द व विविध अनुभव दिले तर सर्वांगिण विकामास चालना मिळेल. शिक्षणामध्ये नवनवीन विषयांचा समावेश केला जातो ज्या मध्ये पर्यावरण शिक्षण, संगणक शिक्षण, कला व कार्यानुभव तसेच परिसर अभ्यास या विषयांचा ही समावेश केलेला आहे पण संकरित अध्यापन पध्दतीमुळे विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानाचे संक्रमन झपाटयाने होत असल्याचे दिसून येत नाही. म्हणून शिक्षकांचा संकरित अध्यापनावावत प्राथमिक शिक्षकांची जागरूकता व दृष्टीकोनात याचा शोध घेऊन आवश्यक सुधारणा करून शैक्षणिक विकास साधने आवश्यक आहे. विद्याधर्थी हा केवळ ज्ञानाचा स्वीकार कृती न होता ज्ञान निर्मिती करणारा व त्या ज्ञानाचा वापर करता येणे गरजेचे आहे. यासाठी शिक्षक हा अधिक प्रभावी व कार्यशील असणे आवश्यक आहे.*

*शिक्षक हा एक मार्गदर्शक, समुपदेशक, संशोधक, राष्ट्रनिर्माता आदर्श व्यक्तीमत्व घडविणारा एक कलाकार आहे. विद्यार्थ्यांच्या आयुष्यात विविध रंग भरणारा चित्रकार आहे. विद्यार्थी समस्या आपली समजून ती सोडविणारा आणि विद्यार्थ्यांच्या आयुष्यात हास्य फुलवणारा असा जादूगर आहे. शिक्षक सतत विद्यार्थ्यांना अध्ययनात व त्यांच्या आयुष्यात येणा-या समस्यांवर उपाय शोधणारे मार्गदर्शक असतात.*

*Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

*संकरित अध्यापनाबाबत शिक्षकांची जागरुकता विकासासाठी अध्ययन-अनुभवांचे स्वरूप बदलावे लागेल अध्ययन अनुभवात विविधता आणावी लागेल विद्यार्थ्यांचा कृतिशील सहभाग सतत मिळविण्यासाठी उपक्रम, कृती, प्रात्याक्षिक प्रयोग, निरीक्षण यांचा उपयोग करावा लागेल. भाषण, संभाषण,गटचर्चा, भूमिकाभिनय यांसारख्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या अभिव्यक्तीला संधी द्यावी लागेल चाचणी द्वारे विद्याध्यांच्या अध्ययनाचा पडताळा घ्यावा लागेल शाळेतील ज्ञानकौशल्ये फक्त शाळेतील चाचण्या पुरती नव्हे तर प्रत्यक्ष जीवन व्यवहारात उपयोगी पाडायची असतील तर त्यामध्ये काळाच्या गरजेनुसार भर घालण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण केली पाहिजे. महणजेच शाळेत नुसते 'शिकण' पुरेसे नाही, तर कोणतीही गोष्ट कशी शिकावावी याचेही शिक्षण घेणे महत्वाचे आहे व यासाठी संकरित अध्यापनाबाबत शिक्षकांची जागरूकता विकसनासाठी उपक्रमकांची सांगड घालणे गरजेचे आहे. अध्यापनासाठी साहित्य आणि सुविधा हया आजच्या अध्यायन व अध्यापनात महत्त्वाच्या आहेत अध्यापनासाठी साहित्य आणि सुविधांचा सकारात्मक वापर अध्ययनात केल्यामुळे शिक्षक आणि विद्यार्थी दोघांचाही दृष्टीने आनंददायी, समाधान आणि सुरक्षिततेचा विचार हा अपेक्षित आहे. त्यामुळे शालेय वातावरणातच शाळा, कुटुंब आणि समाजात वावरण्यासाठी सकारात्मक कौशल्य रूजविण्यासाठी शिक्षकाची भूमिका महत्त्वाची असते. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात संकरित अध्यापनाबाबत शिक्षकांची जागरूकता वाढविणे आवश्याक आहे त्यामुळे संकरित अध्यापनाबाबत शिक्षकांचा दृष्टीकोन विकसित होण्यास मदत होईल.*

**प्रस्तावना:**

ज्ञान मनुष्य तृतीय नेत्रभः अर्थातच ज्ञानाइतके पवित्र जगात दुसरे काहीही नाही. शिक्षण म्हणजे आत्माविष्कार, विद्यार्थ्यांमधील पुर्णत्वाचा आविष्कार, व्यक्तीच्या आंतरिक व नैसर्गिक शक्तीचा गतिमान समतोल म्हणजे शिक्षण होय. शिक्षणाशिवाय कोणताही व्यक्ती आणि समाज समृद्ध, परिपूर्ण व स्वाभिमानी जीवन जगू शकत नाही. म्हणूनच विद्यार्थ्यांचा सर्वागीण विकास हेच शिक्षणाचे महत्त्वाचे उदिष्ट आहे. त्या दृष्टीने विद्यार्थ्यांच्या वर्तनाचा अभ्यास शिक्षणाद्वारे केला जातो. प्रत्येक समाजात विविध प्रसंगी काहीना काही नवीन सतत करावे लगते या सजीवांच्या कृती म्हणजेच वर्तन होय. मानवी वर्तन हे गरजांतून घडत असते. गरजांचे समाधान झाले नाही तर वर्तनाचा समतोल राहत नाही. याचाच अर्थ मानवाचे वर्तन साचेबंध नसून वैविध्यपूर्ण असते यासाठी शिक्षणामध्ये नवनवीन विषयांचा समावेश केला जातो ज्या मध्ये पर्यावरण शिक्षण, संगणक शिक्षण, कला व कार्यानुभव परिसर अभ्यास या विषयांचा हि समावेश केलेला आहे पण संकरित अध्यापन पध्दतीमुळे विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानाचे संक्रमण झपाट्याने होत असल्याचे दिसून येते म्हणून शिक्षकांचा संकरित अध्यापनाबाबत प्राथमिक शिक्षकांची जागरुकता व दृष्टीकोन याचा शोध घेऊन आवश्यक सुधारणा करून शैक्षणिक विकास साधने आवश्यक आहे.

शिक्षक हा एक मार्गदर्शक, संशोधक, राष्ट्रनिर्माता, व्यक्ती घडविणारा एक कलाकार आहे. विद्यार्थाच्या आयुष्यात विविध रंग भरणारा चित्रकार आहे. विद्यार्थी समस्या समजून तो सोडविणारा आणि विद्यार्थ्यांच्या आयुष्यात हास्य फुलवणारा असा जादूगर आहे. शिक्षक सतत विद्यार्थ्यांना अध्ययनात व त्यांच्या आयुष्यात येणा-या समस्यांवर उपाय शोधणारे मार्गदर्शक असतात.

*Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

बालकाची सुरूवातीची वर्षे फार मोलाची आहेत. या काळातील शिक्षणाचा असर आयुष्यभर कायम राहतो. सध्याच्या धावत्या जीवनशैलीमध्ये आई-वडिल दोघेही अर्थार्जनासाठी बाहेर पडत असल्यामुळे विभक्त कुटुंब पद्धती असल्याने लहान मुलांना पालकांचा सहवास फार कमी मिळतो मुले पाळणाघरात वाढतात. त्यामुळे शाळांची पर्यायाने शिक्षकांची जबाबदारी अधिकच वाढली आहे व ही जबाबदारी ओळखून आपण जे विद्यार्थ्यांना घडविण्याचे कार्य करत आहेत ते योग्य दिशेने होत आहे की नाही हे तपासणेही तितकेच महत्वाचे आहे.

शिक्षणाशिवाय कोणतीही व्यक्ती आणि समाज समृद्ध परिपूर्ण स्वाभिमानी जीवन जगू शकत नाही म्हणूनच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हेच शिक्षणाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. त्या दृष्टीने विद्यार्थ्यांचा विकास शिक्षणाद्वारे केला जातो. प्रत्येक सजीवास विविध प्रसंगी ज्ञानप्राप्त होत असते त्यातच आज उपलब्ध माहितीचे विविध शैक्षणिक संसाधने महत्त्वाची व आवश्यक भूमिका बजावत असल्याचे दिसून येते. जगभरातील शिक्षण प्रणाली विविध शैक्षणिक संसाधने द्वारे समृद्ध होत आहे. अध्ययन अध्यापनातील नवतंत्राचा वापर अधिकाधिक केल्यामुळे शिक्षणाची समग्र गुणवत्ता विकास व सुधारण्यासाठी लाभदायक आहे. आपल्या देशातील शैक्षणिक प्रगती व ज्ञानाची गरज भागविण्यासाठी संकरीत अध्यापन सहाय्यभूत होत असल्याचे स्पष्ट दिसून येते.

संकरीत अध्यापन म्हणजेच अध्ययनामध्ये विविध शैक्षणिक स्त्रोत विविध शैक्षणिक स्त्रोत म्हणजे कोणतेही माध्यमातून अध्ययन अध्यापन व संशोधनासाठी वापरली जाणारी साहित्य सामग्री होय ज्यामध्ये उपलब्ध ऑनलाइन व ऑफलाइन विविध समाज उपयोगी साहित्य सामग्री की जी अध्ययनासाठी व अध्यापनासाठी सहज अथवा विनापरवाना म्हणजेच सर्वांसाठी मोफत सहज विनामूल्य विनानिर्बंध उपलब्ध होणारे किंवा आवश्यकतेनुसार वापरता येणारी साहित्य सामग्रीचा वापर होय. नवीन शैक्षणिक धोरणामध्ये शैक्षणिक संसाधने अधिक महत्त्वाचे आहे. दूर शिक्षण व मुक्त शिक्षणामध्ये आज शैक्षणिक संसाधनांचा वापर वाढत आहे ज्यामुळे अध्यापन अधिक प्रभावी होत आहे.

भारतातील शिक्षणक्षेत्रानेही बदलणा-या जगाबरोबर चालण्यासाठी आपल्यात अनेक बदल घडवून आणले आहेत. अभ्यासक्रम, पाठ्यक्रम, पाठ्यपुस्तके, अध्यापनपद्धती, अध्यापनसाधने या सर्वामध्येच खूप बदल झाला आहे. हा बदल स्विकारणा-या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक शिक्षणसंस्था, विदयापीठे आणि शिक्षण मंडळांची निर्मिती झाली. शिक्षणासाठी विदयार्थ्यांना आपल्याकडे ओढण्याची त्यांच्यात स्पर्धा निर्माण झाली. दर्जेदार अभ्यासक्रम, पाठयक्रमाची निर्मिती करणे व चांगल्या शैक्षणिक सुविधा पुरवण्यात या विविध संस्थांमध्ये चढाओढ निर्माण होऊ लागली तर दुसरीकडे विदयार्थ्यांना व पालकांनाही शिक्षणासाठी योग्य शिक्षणमंडळे व विदयापीठे निवडण्याचा

*Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

पर्याय उपलब्ध झाला. अशा प्रकारे शिक्षण क्षेत्राचाही विस्तार होऊन राज्यस्तरापासून राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर शिक्षण देणा-या शिक्षण संस्था पालकांना आता त्यांच्या स्थानिक पातळीपर्यंत उपलब्ध होऊ लागल्या. म्हणूनच त्यांच्यामधून योग्य शिक्षण संस्थेची निवड करण्यासाठी त्यांच्या अभ्यासक्रम व पाठ्यक्रमात समाविष्ट घटकांच्या अभ्यासाची गरज निर्माण झाली. बदलत्या परिस्थितीनुसार राष्ट्रीय गरजांमध्ये बदल होत असतो, त्यानुसार शैक्षणिक धोरणे बदलावी लागतात. पूर्वीच्या अभ्यासक्रमाचे व पाठ्यक्रमाचे सदयस्थितीच्या दृष्टीने मूल्यमापन करावे लागते. भविष्यातील सामाजिक गरजा लक्षात घेवून अभ्यासक्रम पाठ्यक्रमाची रचना करावी लागते. कोणत्याही विषयाचा अभ्यासक्रम कधीही अंतिम नसतो त्याच्यात कालपरत्वे सतत बदल करावे लागतात.

**What are the hybrid teaching?**

Hybrid teaching is a teaching model that combines face-to-face and online instruction. It can involve:

- Alternating periods: Some days or weeks may alternate between remote and face-to-face teaching.
- Different class mixes: Some classes may be online while others are in-person, or the mix may be 50/50.
- Online activities: Students may participate in online quizzes, discussions, and other activities.
- Personalized learning: Students can work at their own pace and access a variety of online resources.
- Face-to-face engagement: Students can participate in in-person discussions and activities with their peers and instructors.
- Flexible class time: Class periods may be substituted with online or offline activities.

Hybrid teaching became more common during the COVID-19 pandemic when school districts limited classroom sizes. It offers a variety of benefits, including:

- Increased access to higher education
- Addressing students' learning preferences
- Capitalizing on the strengths of both face-to-face and online teaching

However, hybrid teaching requires careful planning to ensure that both formats work well together. Instructors need to be familiar with the strengths of each format and how they can feed into each other.

Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

पारंपारिक शिक्षण पद्धतीमुळे विद्यार्थ्यांना चैतन्यमय वातावरण आणि त्यांचे शिक्षक आणि सहकारी विद्यार्थी प्रदान करतात, जे कोणत्याही मुलाच्या सर्वांगीण वाढीसाठी अत्यंत महत्त्वाचे असते.

**संकरित शिक्षण म्हणजे काय?**

हायब्रीड अध्यापन हे एक शैक्षणिक मॉडेल आहे ज्यामध्ये काही विद्यार्थी सामान्यपणे व्याख्यान किंवा सेमिनारमध्ये वैयक्तिकरित्या उपस्थित राहतात, तर काही घरातून अक्षरशः सहभागी होतात. म्हणून व्याख्याते ऑक्सफर्डमधील डिजिटल साधनांच्या संपूर्ण श्रेणीसह टीम्स किंवा झूम सारख्या साधनांचा वापर करून एकाच वेळी दूरस्थ आणि वैयक्तिक विद्यार्थ्यांना शिकवतात. भिन्नता म्हणून, व्याख्याते विद्यार्थ्यांना वर्गात आणि ऑनलाइन सत्रे वितरीत करण्यासाठी दूरस्थपणे देखील कार्य करू शकतात. संकरित वितरणामध्ये असंख्य भिन्नता आहेत, सामान्यतः खेळात असलेल्या उपकरणांच्या प्रमाणात. या संसाधनांचा उद्देश या भिन्नता स्पष्ट करणे, फायदे आणि आव्हाने हायलाइट करणे आणि संकरित अध्यापनात वापरण्यासाठी निवडी आणि साधने निवडण्यासाठी माहितीपूर्ण मार्गदर्शक प्रदान करणे आहे. काही प्रकरणांमध्ये, हायब्रीड इव्हेंटमध्ये समोरासमोर वर्ग सत्रांना समर्थन देण्यासाठी ऑनलाइन व्यायाम आणि पूर्व-रेकॉर्ड केलेल्या व्हिडिओ सामग्रीसह असिंक्रोनस शिक्षण घटकांचा समावेश असू शकतो – आपल्यापैकी बऱ्याच जणांना या प्रक्रियेचा अलीकडचा महत्त्वपूर्ण अनुभव आहे, लेक्चर बनवण्यासाठी Panoptic आणि Canvas वापरून उपलब्ध.

संकरित दृष्टीकोन दर्जेदार शिक्षण आणि शिकवण्याच्या संधींपर्यंत विद्यार्थ्यांच्या प्रवेशाच्या समस्या सोडवणार नाही. संकरित शिक्षण घेण्यापूर्वी काळजीपूर्वक विचार केला पाहिजे. तथापि, युनिव्हर्सिटी ओळखते की असे प्रसंग येतात जेव्हा तुम्ही विशिष्ट समस्यांना प्रतिसाद म्हणून हायब्रिड शिकवण्याचा विचार करू शकता. उदाहरणार्थ, कोविड-19 साथीच्या रोगाने लादलेल्या निर्बंधांमुळे, विशेषतः जेथे ते यूकेला प्रवास करण्यास असमर्थ आहेत अशा ठिकाणी विद्यार्थ्यांना अध्यापन आणि शिक्षणासाठी सतत प्रवेश प्रदान करणे.

संकरित अध्यापन सत्राद्वारे चांगला विद्यार्थी अनुभव प्राप्त करणे सोपे नाही आणि सामान्यतः आवश्यक आहे:

- शिक्षकांद्वारे मल्टी-टास्किंग - हायब्रिड तणावमुक्त अनुभवासाठी अनुकूल नाही!
- मदत - चॅटचे निरीक्षण करण्यासाठी आणि दूरस्थ विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी तुम्हाला निःसंशयपणे समर्थनाची आवश्यकता असेल.
- री-डिझाइन - तुम्हाला दोन्ही प्रेक्षक विचारात घेण्यासाठी सत्रे पुन्हा-डिझाइन करणे आवश्यक आहे.

*Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

- किट – तुम्हाला वर्गात अतिरिक्त IT उपकरणे (उदा. कॅमेरा आणि माइक) आवश्यक असतील.
- आत्मविश्वास - तुम्हाला मजबूत तांत्रिक कौशल्ये आवश्यक असतील आणि आत्मविश्वास बाळगा - गोष्टी चुकीच्या होतील आणि समस्या जागेवर सोडवण्याची क्षमता आवश्यक आहे.
- वेळ - नियोजन आणि सेट अप खूप वेळखाऊ आहे.

**समस्या निवडण्याची कारणे व त्याचे फायदे**

१. परिपुर्ण शिक्षक विकास सकारात्मक जीवन जगण्यासाठी तसेच शिक्षकांच्या कामाला प्रोत्साहन देण्यासाठी आत्मभान, आत्मगौरव या वरोवरच नव तंत्रज्ञानाच्या सहाय्याने कोणताही शिक्षक स्वतःचे सामर्थ्य आणि कमतरता समजावून घेऊ शकते. शिक्षक नवनवे आव्हाने व संधी ओळखून धोक्यांना सामोरे जाण्याची तयारी करू शकते.

२. आंतरव्यक्तीक कौशल्यामधुन समुहविकास संकरित अध्यापनामुळे विद्याथ्याचा कौटुंविक आणि सामाजिक जाणिवांचा विकास होईल. विविध पद्धतीचा वापर केल्याने विद्यार्थी कृतीयुक्त सहभाग घेईल ज्यामुळे आंतरव्यक्तीक कौशल्य विकसित होऊन व्यक्ती स्वतःच्या जीवनात, कुटुंबात आणि समाजात निर्माण होणा-या समस्या ओळखून त्यांना यशस्वीपणे सामोरे जाऊ शकतो.

३. सामाजिक विकास: संकरित अध्ययन व अध्यापनाच्या सहाय्यने शिक्षक व विद्यार्थी सामाजिक पश्न सोडविताना विविध पर्यायांचा आणि फायदया तोटयांचा विचार करतील व त्यचा परिणाम म्हणजे चांगले आंतर्वक्तिक संबंध निर्माण होऊन सामाजिक विकास साधण्यास मदत होते. त्यामुळे सकारात्मक नाते संबंध निर्माण होऊन समुहात गटाबरोबर कार्य करण्यासाठी खूप फायदेशिर ठरेल. शिक्षकांना शिक्षण व्यवहार करताना ही कौशल्य खूपच उपयुक्त आहेत.

४. तंत्रज्ञानाधिष्ठीत कौशल्याचा विकास :- जागतिकीकरणामुळे नवे तंत्रज्ञान आणि नवी जीवनशैली स्विकारली त्यामुळे पर्यावरणाचा विनाश होत आहे. मुलांना पर्यावरण समृध्दी आणि विकासासाठी तसेच पर्यावरणीय समस्यांना सामोरे जाण्यासाठी आणि मानवी जीवनाशी जुळवून घेण्यासाठी चांगले निती मुल्य व इतर कौशल्य मार्गदशक ठरतात.

५. सकारात्मक कौशल्यांचा कृतीयुक्त विकास: संकरित अध्यापनाबाबत शिक्षकांच्या जागृकतेतून ठराविक आरोग्यदायी आणि सकारात्मक कौशल्यांचा समावेश होतो. त्यामुळे मुलांना व्यसनापासुन व इतर धोक्यापासून वाचण्याची प्रेरणा मिळते.

अशा प्रकारे संकरित अध्यापनाबाबत शिक्षकांची जागरूकता व दृष्टीकोन विकासातून भविष्य व सध्यस्थिती यातील अंतर भरून काढण्यासाठी अभ्यासक्रमातून वैयक्तीक, सामाजिक आणि राष्ट्रीय विकास साधण्यासाठी संकरित अध्यापन उपयुक्त ठरेल. परंतु विविध संकरित अध्यापन कौशल्ये

विकसीत करण्यासाठी आपण जे काही उपक्रम राबवितो त्याच्या माध्यमातून शिक्षकांमध्ये अपेक्षित बदल होत आहे का हे तपासणे ही तितकेच महत्वाचे आहे याचसाठी संकरित अध्यापन कौशल्ये विद्यार्थ्यांनध्ये विविध उपक्रमांच्या माध्यमातून किती प्रमाणात रूजली तसेच उपक्रमांचा संकरित अध्यापन कौशल्य रुजविण्यात किती प्रेरणात्मक परिणाम झाला हे तपासणेही तितकेच महत्वाचे वाटते यासाठी या समस्येची निवड करण्यात आली.

**संकल्पनात्मक मांडणी**

संकरित अध्यापनात शिक्षकांची जागरूकता व दृष्टीकोनाच्या अभ्यासात घर, शाळा, समाज ह्या तिन्हीचा परिणाम त्यावर होतो. शिक्षकांना नवसंकरित अध्यापन पध्दती संपादनाची संधी दिली व त्यांच्या जोडीला समृध्द व विविध अनुभव दिले तर सर्वांगिण विकासात चालना मिळेल. समाजाचा सांस्कृतिक वारसा, आर्थिक स्थिती, राजकीय स्थिती व औदयोगिक वातावरण हवा सर्वांच्याच विकासावर नवी अध्यापन पध्दतीचा परिणाम होतो ज्यामुळे कौशल्याधिष्टीत व्यक्ती निर्माण होईल शालेय व्यवहारात नव्या वाटा निर्माण करावयाच्या आहेत. त्यासाठी वर्गातील शिक्षण व्यवहार बदलावा लागेल इतके दिवस शिक्षक शिकवितात म्हणून विद्यार्थी शिकतात या धामक कल्पनेत आपण होतो परंतु आता शिक्षकाने आपल्या या कल्पनेतून बाहेर पडले पाहिजे व ज्यामध्ये संकरित अध्यापनाचा वापर महत्त्वाचा ठरतो. मानव हा हेतूपूर्ण ज्ञानप्राप्ती करणारा पाणी आहे. विद्यार्थी हा केवळ ज्ञानाचा स्वीकार न करता ज्ञान निर्मिती करणारा व त्या ज्ञानाचा वापर करता येणारा होणे गरजेचे आहे. यासाठी शिक्षक हा अधिक प्रभावी व कार्यशिल असणे आवश्यक आहे.

संकरित अध्यापनाबाबत शिक्षकांची जागरूकता व दृष्टीकोन विकासासाठी अध्ययन-अनुभवांचे स्वरूप वदलावे लागेल अध्ययन अनुभवात विविधता आणावी लागेल विद्यार्थ्यांचा कृतिशील सहभाग सतत मिळविण्यासाठी उपक्रम, कृती, प्रात्याक्षिक प्रयोग, निरीक्षण यांचा उपयोग करावा लागेल. गटचर्चा, भाषण, संभाषण, भूमिकाभिनय यांसारख्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या अभिव्यक्तिला संधी द्यावी लागेल चाचणीच्या द्वारे विद्यार्थ्यांचा अध्ययनाचा पडताळा ध्यावा लागेल शाळेतील ज्ञानकौशल्ये फक्त शाळेतील चाचण्या पुरते नव्हे तर प्रत्यक्ष जीवन व्यवहारात उपयोगी पडायची असतील तर त्यामध्ये काळाच्या गरजेनुसार भर घालण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण केली पाहिजे. म्हणजेच शाळेत नुसते 'शिकणे' पुरेसे नाही, तर कोणतीही गोष्ट कशी शिकावावी याचेही शिक्षण घेणे महत्वाचे आहे व यासाठी संकरित अध्यापनाबबत शिक्षकांची जागरूकता व दृष्टीकोन विकासनासाठी उपक्रमकांच सांगडा घालणे गरजेचे आहे.

*Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

विद्यार्थ्यांच्या शारीरिक मानसिक विकासामध्ये त्यांचा किशोरवयीन कालखंड अत्यंत महत्वाचा असतो या वयात त्यांच्यात अनेक बदल होत असतात. आपल्यात होणा-या बदलांची जाणीव त्यांना नसते. अशावेळी ते गोंधळून जाण्याची शक्यता असते. अशावेळी 'घर व शाळा' या सामाजिक संस्थेने या बदलावाबबत पुरेशी व योग्य माहिती देणे आवश्यक आहे म्हणून संकरित अध्यापनाचा वापर व शिक्षकांची जागरूकता व त्याविषयीचा दृष्टीकोन महत्त्वाचा आहे. संकरित अध्यापनाच्या वापरामुळे विद्यार्थी जीवन जगण्यासाठी सक्षम व जीवनाच्या विविध क्षेत्रातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी 'सशक्त' होऊ शकतात तसेच जीवनाला सामोरे जातांना समाधानानी, कृत कृत्यतेची भावना निर्माण झाली पाहिजे. जी इतर कोणत्याही लौकिक मिळकते पेक्षा अधिक मौल्यवान असते. ती नेमकी कोणती? यांचे उत्तर एखादी व्यक्ती कशी जगली यात दडलेले असते. ज्याला जगण्याचे रहस्य उलगडते, त्याला कशासाठी कसे जगायचे याचे मार्ग आपोआप सापडतात. म्हणून व्यक्तीमध्ये असलेल्या शारीरिक, मानसिक बौध्दीक अशा सर्वोत्कृष्ठ क्षमतांचा संपुर्ण विकास म्हणजेच व्यक्तीमत्त्वाचा सर्वांगीण विकास होय ज्यासाठी संकरित अध्यापनाचा वापर अधिकाधिक होणे आवश्यक आहे.

**संशोधन शीर्षक :**

**"संकरित अध्यापनाबाबत प्राथमिक शाळेतील शिक्षकांची जागरूकता व दृष्टीकोनाचा अभ्यास"**

**संशोधन समस्या**

**"संकरित अध्यापनाबाबत मुंबई महानगरपालिका प्राथमिक शाळेतील शिक्षकांची जागरूकता व दृष्टीकोनाचा अभ्यास"**

**महत्त्वाच्या संज्ञांच्या कार्यात्मक व्याख्या :**

**१. संकरित अध्यापनाबाबत प्राथमिक शिक्षकांची जागरूकता :**

"शिक्षणाची प्रक्रिया जी प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्याच्या विविध गरजा आणि क्षमता पुर्ण करण्यासाठी विविध शिक्षण पध्दतींचे मिश्रण करते यामध्ये शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या व्यक्तिगत गरजा समजून घेणे आणि त्यानुसार शिक्षण देणे या संदर्भात शिक्षकांना असलेली माहिती म्हणजे संकरित अध्यापनाबाबत प्राथमिक शिक्षकांची जागरूकता असे म्हणतात."

**२. संकरित अध्यापनाबाबत शिक्षकांचा दृष्टीकोन :**

"प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या विविध गरजा, क्षमता, कमकुवतपणा समजून त्या पुर्ण करण्यासाठी विविध शिक्षण पध्दतींचे मिश्रण व तंत्रज्ञानाचा वापर करून नियमित मुल्यमापन व विद्यार्थी

*Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

संवाद ठेऊन शिक्षकांनी विद्यार्थ्यांना करावयाच्या शिक्षकांची असलेले विचार म्हणजे संकरित अध्यापनात प्राथमिक शिक्षकांचा दृष्टीकोन होय."

**संशोधनाची ध्येये :**

सदर संशोधनाची उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत :

१. संकरित अध्यापनाबाबत प्राथमिक शिक्षकांची जागरूकता अभ्यासणे.

२. संकरित अध्यापनाबाबत प्राथमिक शिक्षकांचा दृष्टीकोन अभ्यासणे.

३. संकरित अध्यापनाबाबत प्राथमिक शिक्षकांची जागरूकता व दृष्टीकोन यातील सहसंबंध अभ्यासणे.

४. संकरित अध्यापनाबाबत प्राथमिक स्त्री शिक्षक व पुरूष शिक्षकांच्या जागरूकतेतील फरक अभ्यासणे.

५. संकरित अध्यापनाबाबत प्राथमिक स्त्री शिक्षक व पुरूष शिक्षकांच्या दृष्टीकोनाचा फरक अभ्यासणे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१. संकरित अध्यापनावावत प्राथमिक शिक्षकांच्या जागरूकतेचा अभ्यास करणे.

२. संकरित अध्यापनावावत प्राथमिक शिक्षकांच्या दृष्टीकोनाचा अभ्यास करणे.

३. संकरित अध्यापनाबाबत प्राथमिक एकूण शिक्षकांची जागरूकता व दृष्टीकोन यातील सहसंबंधाचा अभ्यास करणे.

४. संकरित अध्यापनाबाबत प्राथमिक स्त्री शिक्षक व पुरूष शिक्षकांच्या जागरूकतेची तुलना करणे.

५. संकरित अध्यापनाबाबत प्राथमिक स्त्री शिक्षक व पुरूष शिक्षकांच्या दृष्टीकोनाची तुलना करणे.

**संशोधनाची गृहितके :**

१. संकरित अध्यापनाबाबत पाथमिक शिक्षकांची जागरूकता कमी असावी.

२. संकरित अध्यापनाबाबत प्राथमिक शिक्षकांचा दृष्टीकोन विकसीत होणे आवश्यक आहे. ३. संकरित अध्यापनाबाबत प्राथमिक शिक्षकांची जागरूकता व दृष्टीकोन यात महसंबंध असावा.

४. संकरित अध्यापनाबाबत प्राथमिक स्त्री शिक्षक व पुरुष शिक्षकांची जागरूकता व दृष्टीकोन यात सहसंबंध असावा.

५. संकरित अध्यापनाबाबत प्राथमिक स्त्री शिक्षक व पुरूष शिक्षकांच्या जागरूकतेची फरक असावा.

६. संकरित अध्यापनाबाबत प्राथमिक स्त्री शिक्षक व पुरूष शिक्षकांच्या दृष्टीकोनाची फरक **असावा.**

**संशोधनाची शून्य परिकल्पना :**

१. संकरित अध्यापनाबाबत एकूण प्राथमिक शिक्षकांची जागरूकता व दृष्टीकोनात लक्षणीय सहसंबंध नाही.

२. संकरित अध्यापनाबाबत प्राथमिक स्त्री शिक्षक व पुरूष शिक्षकांच्या जागरूकतेत लक्षणीय फरक नाही.

३. संकरित अध्यापनाबाबत प्राथमिक स्त्री शिक्षक व पुरूष शिक्षकांच्या दृष्टीकोनात लक्षणीय फरक नाही.

**संशोधन प्रश्न :**

१. संकरित अध्यापनाबाबत प्राथमिक शिक्षकांची जागरूकता कशी आहे?

२ . संकरित अध्यापनाबाबत प्राथमिक शिक्षकांचा दृष्टीकोन कसा आहे?

३. संकरित अध्यापनाबाबत शिक्षकांची जागरूकता व दृष्टीकोन यात सहसंबंध कसा आहे?

४. संकरित अध्यापनाबाबत स्त्री शिक्षक व पुरुष शिक्षकांची जागरूकता व दृष्टीकोन यात सहसंबंध कसा आहे?

५. संकरित अध्यापनाबाबत स्त्री शिक्षक व पुरुष शिक्षकांच्या स्वप्रतिष्ठेतील फरक किती आहे?

६. संकरित अध्यापनाबाबत स्त्री शिक्षक व पुरुष शिक्षकांच्या जागरूकतेचाफरक किती आहे?

७. संकरित अध्यापनाबाबत स्त्री शिक्षक व पुरुष शिक्षकांच्या दृष्टीकोनाची फरक किती आहे?

**संशोधनाची गरज :**

१. संकरित अध्यापनाबाबत प्राथमिक शाळेतील शिक्षकांची जागरूकतेचा शोध घेण्यासाठी संशोधन करणे गरजेचे आहे.
२. प्राथमिक शाळेतील निक्षकांना स्वअध्ययनासाठी गरजेचे आहे.
३. संकरित अध्यापनाबाबत प्राथमिक शाळेतील शिक्षकांची जागरूकता व दृष्टीकोनाची माहिती प्राप्त होण्यासाठी गरजेचे आहे.
४. संकरित अध्यापनाबाबत प्राथमिक शाळेतील शिक्षकांना आवड निर्माण करण्यासाठी गरजेचे आहे.
५. संकरित अध्यापनाबाबत प्राथमिक शाळेतील शिक्षकांची संकल्पना स्पष्ट होण्यासाठी गरजेचे आहे.
६. संकरित अध्यापनाबाबत प्राथमिक शाळेतील शिक्षकांना गोडी निर्माण होण्यासाठी गरजेचे आहे.
७. संकरित अध्यापन संकल्पना व वापर करणे प्राथमिक शाळेतील शिक्षकांना सोपे जाण्यासाठी गरजेचे आहे.

*Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

८. संकरित अध्यापन संकल्पना व वापर प्राथमिक शाळेतील शिक्षकांना समजणे गरजेचे आहे कारण त्यांना त्यांच्या दैनंदिन जीवनात उपयोगी पडेल व आजच्या काळात आवश्यक आहे.

अभ्यासक्रम, पाठयकम, अध्ययन, अध्यापन व शैक्षणिक व्यवस्थापणात नवनवीन ज्ञानाची पर्याप्तता, अभ्यासक्रम व पाठयक्रमाच्या अंमलबजावणीचा परिणाम, शैक्षणिक समस्यांचे निराकरण, शिक्षण प्रक्रियेतील शास्त्रीय दृष्टीकोण, शैक्षणिक धोरणांची निर्मिती व परिणाम, शिक्षण प्रक्रियेला गतिमानता देणे, शिक्षण प्रक्रियेत व शैक्षणिक परिस्थीतीत आवश्यक सकारात्मक बदल करणे तसेच शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी संशोधन करणे गरजेचे आहे.

संकरित अध्यापनाबाबत शिक्षकांना अडचणी येत असल्याचे आढळून आले म्हणून अशा शिक्षकांची कारणे जाणून घेण्यासाठी तसेच संकरित अध्यापनाबाबत प्राथमिक शाळेतील शिक्षकांची जागरूकतेचाशोध घेण्यासाठी सदर संशोधनाची गरज आहे.

संशोधनाचे महत्व :

शैक्षणिक प्रक्रियेचा एक महत्त्वपूर्ण भाग म्हणजे शैक्षणिक संशोधन होय शैक्षणिक प्रगती शिक्षण क्षेत्रात काल सुसंगत बदल घडवून आणणे समस्या निराकरण जुन्या संकल्पनांचा नवीन अर्थ प्राप्त करून देणे शैक्षणिक प्रक्रियेला नवीनता प्रदान करणे गतिमानता देणे व ज्ञान शाखेत ज्ञानाचे वृद्धी करणे यासाठी शैक्षणिक संशोधन महत्वाचे ठरते

**प्रस्तुत शैक्षणिक संशोधनाचे महत्त्व :**

शिक्षणाचा उद्देश विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक विकास करणे हा आहे. समाजातून व कूटूंबातून मिळणा-या शिक्षणाने व्यक्ति ही आयुष्यात येणा-या प्रश्नांना तोंड देण्याचा मार्ग शोधत असते. त्यामुळे शिक्षक जर समाधानी असेल तर ते आपले काम अधिक चांगल्याप्रकारे करू शकतात व त्याचा फायदा विद्यार्थी, पालक, शाळा, कुटूंब व समाजाला तसेच शासनाला होईल.

शिक्षकांना शालेय व सामाजिक वातावरणाने इतरांप्रती जागरूकता राहण्याची स्वतःची जबाबदारी व संकरित अध्यापनाच्या आधारे शिक्षकांची जागरूकता व दृष्टीकोन समजण्यास मदत होईल संकरित आध्यापनाबाबत शिक्षकांची जागरूकता व दृष्टीकोनाच्या अभ्यासाने योग्य प्रकारचे नियोजन, संघटन व नियंत्रण ठेवून संकरित अध्यापनाबाबत शिक्षकांची जागरूकता व दृष्टीकोन वाढविण्यास तसेच संस्थेच्या प्रगतीसाठी व्यवस्थापनाला करावयाच्या कार्याविषयी सदर संशोधन विषयाची मदत होईल. प्राथमिक शाळेतील मानवी घटक व भौतिक घटकांचे सुसूत्र गुंफन करण्यासाठी संकरित अध्यापनाबाबत शिक्षकांची जागरूकता व दृष्टीकोनाचा अभ्यास योग्य पध्दतीने करता येईल. संकरित अध्यापनाबाबत शिक्षकांची जागरूकता व दृष्टीकोन वाढल्यास यातून शिक्षकांना व्यवसाय

*Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

समाधान मिळेल व त्याचा परिणाम शिक्षकांच्या स्वप्रतीष्ठा जपवणूकीसाठी उपयोगी ठरेल संकरित अध्यापनाबाबत शिक्षकांची जागरूकता व दृष्टीकोन वाढविण्यासाठी विविध योजना राबविण्यात मदत होईल तसेच अप्रत्यक्षपणे याचा फायदा शिक्षक तसेच शिक्षण प्रणाली व विद्यार्थी यांना होऊन देशाचा शैक्षणिक क्षेत्रातील विकास होण्यास हातभार लागण्यास मदत होईल. शिक्षण हे जीवनाशी संबंधित असल्यामुळे त्याचे ध्येय धोरणे ठरविणे व ही ध्येय धोरणे राबविण्यासाठी देशाची भौगोलिक परिस्थिती, सांपत्तिक स्थिती, आशा आकांक्षा हे सर्व ठरवून अंमलबजावणी करण्यासाठी शैक्षणिक प्रशासनाची आवश्यकता आहे. शैक्षणिक प्रशासन व शालेय प्रवेशा संदर्भात निरनिराळे स्वताःचे अस्तित्व टिकविण्यासाठी व संस्थेच्या वातावरणाचा व इतर घटकांचा अभ्यास करण्यासाठी शिक्षकांची संकरित अध्यापनाबाबतची जागरूकता व दृष्टीकोन हा महत्त्वाचा घटक आहे तसेव त्यांना योग्य मदत होईल.

सदर संशोधनाचा उपयोग पाथमिक शिक्षकांना स्वतः मधील संकरित अध्यापनाबाबतची जागरूकता व दृष्टीकोन वाढविण्यासाठी उपयोगी ठरेल हे स्वतःतील संकरित अध्यापनाबाबतची जागरूकता कळण्यास मदत होईल

**संशोधनाची व्याप्ती, मर्यादा व परीमार्यादा :**

**अ) व्याप्ती**

१. सदर संशोधनाचे निष्कर्ष हे प्राथमिक शाळेतील शिक्षकांना लागू आहे.

२. सदर संशोधनाचे निष्कर्ष हे सर्व माध्यमाच्या पाथमिक शाळांना लागू आहे

३. सदर संशोधनाचे निष्कर्ष संकरित अध्यापनाशी संबंधीत आहे.

४. सदर संशोधनाचे निष्कर्ष संकरित अध्यापनाबाबत शिक्षकांची जागरूकता व दृष्टीकोनाला लागू आहे.

**ब) मर्यादा**

१. काल मर्यादा : प्रस्तुत संशोधन हे २०२२ ते २०२४ पर्यंत मर्यादित आहे.

२. आशय मर्यादा : पस्तुत संशोधन हे संकरित अध्यापनाबाबत शिक्षकांची जागरूकता व दृष्टीकोनाच्या अभ्यासापुरतेच मर्यादित आहे.

३. भौगोलीक मर्यादा: प्रस्तुत संशोधन हे मुंबई जिल्ह्यातील प्राथमिक शाळेच्या शिक्षकांपुरते मर्यादित आहे.

४. प्रस्तुत संशोधन हे औपचारीक शिक्षणापुरते मर्यादित आहे.

५. प्रस्तुत संशोधन हे प्राथमिक शाळेपुरतेच मर्यादित आहे.

*Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**क) परिमर्यादा**

प्रस्तुत संशोधन हे प्राथमिक शाळेच्या संकरित अध्यापनाबाबत शिक्षकांची जागरूकता व दृष्टीकोनाचा अभ्यास या संशोधन समस्येपुरते मर्यादित आहे तसेच प्रस्तुत संशोधनात पाथमिक शाळेच्या शिक्षकांपुरतेच मर्यादित आहे.

**माहिती संकलनाची साधने :**

प्रस्तुत संशोधनासाठी खालील संशोधन साधनांचा वापर करण्यात आला.

१. संकरित अध्यापनाबाबत शिक्षकांची जागरूकता पदानिस्चेन्श्रेणी

२. संकरित अध्यापनाबाबत शिक्षक दृष्टीकोन पदानिस्चेन्श्रेणी

**प्रस्तुत संशोधनासाठी वापरलेली संख्याशास्त्रीय साधने / तंत्रे :**

१. कोष्टकीकरण, २. शेकडेवारी, ३. 'टी' परीक्षिका, ४. सहसंबंध गुणांक

**संशोधनाचे निष्कर्ष :**

**संशोधनाची शून्य परिकल्पना १.**

**संकरित अध्यापनाबाबत एकूण प्राथमिक शिक्षकांची जागरूकता व दृष्टीकोनात लक्षणीय सहसंबंध नाही.**

सारणी मध्ये संकरित अध्यापनाबाबत एकूण प्राथमिक शिक्षकांची जागरूकता व दृष्टीकोन यामधील सहसंबंध गुणकाची सार्थकता दिसून येते.

संकरित अध्यापनाबाबत एकूण प्राथमिक शिक्षकांची

जागरूकता व दृष्टीकोन यातील सहसंबंध

| **नमुना** | **स्वाधीनता मात्रा** | **कोष्टकीय 'r'** | | **सहसंबंध गुणक** | **सार्थकता स्तर** | **प्रसरण** |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **0.01** | **0.05** | | | **100 $r^2$** |
| **260** | **258** | **0.081** | **0.103** | **0.0484** | **लक्षीणय सहसंबंध नाही** | **1.48%** |

सहसंबंध गुणकाचे अर्थनिर्वचन

वरील सारणीवरून असे दिसून येते की, प्राप्त 'r' स्तरावरील ०.०४८४ हा ०.०८१ पेक्षा कमी आहे. म्हणून संकरित अध्यापनाबाबत एकूण प्राथमिक शिक्षकांची जागरूकता व दृष्टीकोनात लक्षणीय सहसंबंध नाही ही परिकल्पना स्विकार्य आहे. म्हणून संकरित अध्यापनाबाबत एकूण प्राथमिक शिक्षकांची जागरूकता व दृष्टीकोनात लक्षणीय सहसंबंध नाही.

*Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

निष्कर्ष : संकरित अध्यापनाबाबत एकूण प्राथमिक शिक्षकांची जागरूकता व दृष्टीकोनात लक्षणीय सहसंबंध नाही.

**संशोधनाची शून्य परिकल्पना २.**

**संकरित अध्यापनाबाबत प्राथमिक स्त्री शिक्षक व पुरूष शिक्षकांच्या जागरूकतेत लक्षणीय फरक नाही.**

सारणी मध्ये संकरित अध्यापनाबाबत प्राथमिक स्त्री शिक्षक व पुरूष शिक्षकांच्या जागरूकतेतील फरकाची लक्षणीयता दर्शविली आहे.

संकरित अध्यापनाबाबत प्राथमिक स्त्री शिक्षक व पुरूष शिक्षकांच्या
जागरूकतेतील फरकाची लक्षणीयता

| गट | नमुना | मध्यमान | प्रमाण विचलन | स्वाधीनता मात्रा | सारणी मूल्य | | 'टी' परीक्षेकेचे गुणोत्तर | सार्थकता स्तर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 0.05 | 0.01 | | |
| स्त्री शिक्षक | 260 | 197 | 15.70 | 258 | 1.96 | 2.59 | 1.15 | लक्षणीय फरक नाही. |
| पुरूष शिक्षक | 260 | 198.57 | 15.37 | | | | | |

'टी' परीक्षेकेचे अर्थनिर्वचन: वरील सारणीवरून असे दिसून येते की 'टी' मूल्य 1.15 ही 0.05 स्तरावरील कोष्टकीय 'टी' 1.96 पेक्षा कमी आहे म्हणून ही परिकल्पना स्वीकार्य आहे.

अनुमान : संकरित अध्यापनाबाबतव प्राथमिक स्त्री शिक्षक व पुरूष शिक्षकांच्या जागरूकतेत लक्षणीय फरक नाही.

निष्कर्ष : संकरित अध्यापनाबाबत मुंबई महानगरपालिका शाळेतील प्राथमिक स्त्री शिक्षक व पुरूष शिक्षकांच्या जागरूकतेत लक्षणीय फरक नाही कारण आज सर्वत्र समानता निर्माण झाल्याने संकरित अध्यापनाबाबत प्राथमिक स्त्री शिक्षक व पुरूष शिक्षकांच्या जागरूकता समान असावी.

**संशोधनाची शून्य परिकल्पना ३**

संकरित अध्यापनाबाबत प्राथमिक स्त्री शिक्षक व पुरूष शिक्षकांच्या दृष्टीकोनात लक्षणीय फरक नाही.

सारणी मध्ये संकरित अध्यापनाबाबत प्राथमिक स्त्री शिक्षक व पुरूष शिक्षकांच्या दृष्टीकोनातील फरकाची लक्षणीयता दर्शविली आहे.

संकरित अध्यापनाबाबत प्राथमिक स्त्री शिक्षक व पुरूष शिक्षकांच्या

दृष्टीकोनातील फरकाची लक्षणीयता

| गट | नमुना | मध्यमान | प्रमाण विचलन | स्वाधीनता मात्रा | सारणी मूल्य 0.05 | सारणी मूल्य 0.01 | 'टी' परीक्षेकेचे गुणोत्तर | सार्थकता स्तर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| स्त्री शिक्षक | 260 | 183.79 | 10.93 | 258 | 1.96 | 2.59 | 4.90 | 0.01 |
| पुरूष शिक्षक | 260 | 184.36 | 10.61 | | | | | |

**'टी' परीक्षेकेचे अर्थनिर्वचन :** वरील सारणीवरून असे दिसून येते की, संकरित अध्यापनाबाबत प्राथमिक स्त्री शिक्षक व पुरूष शिक्षकांच्या दृष्टीकोनातील तुलनेत प्राप्त 'टी' ४.१० हा २.५१ पेक्षा जास्त आहे. म्हणून संकरित अध्यापनाबाबत प्राथमिक स्त्री शिक्षक व पुरूष शिक्षकांच्या दृष्टीकोनात ०.०१ स्तरावर लक्षणीय फरक आहे. यावरून असे म्हणता येईल की संकरित अध्यापनाबाबत प्राथमिक स्त्री शिक्षक व पुरूष शिक्षकांच्या दृष्टीकोनातील लक्षणीय फरक नाही ही शून्य परिकल्पना त्याज्य ठरली आहे.

**निष्कर्ष :** संकरित अध्यापनाबाबत प्राथमिक स्त्री शिक्षक व पुरूष शिक्षकांच्या दृष्टीकोनात लक्षणीय फरक दिसून येतो. म्हणजेच संकरित अध्यापनाबाबत प्राथमिक स्त्री शिक्षक व पुरूष शिक्षकांचा तुलनेत पुरूष शिक्षकांचा दृष्टीकोन जास्त चांगला आहे.

**संशोधनाच्या शिफारशी**

**अ) विद्यार्थ्यांसाठी शिफारशी**

१. विद्यार्थ्यांनी कृतीयुक्त शालेय शिक्षणाचे महत्त्व समजून घ्यावे.

२. विद्यार्थ्यांनी पालक, शिक्षक व समाजाच्या आज्ञांचे काटेकोर पालन करावे.

३. विद्यार्थ्यांनी चांगले ज्ञान प्राप्त करण्यासाठी स्वयं प्रेरीत असावे व कार्यशिल राहावे.

४. विद्यार्थ्यांनी आपल्या वोधात्मक, भावात्मक व क्रियात्मक विकासाकडे लक्ष द्यावे.

५. विद्यार्थ्यांनी नवीन ज्ञान मिळवण्यासाठी सतत प्रयात्नशिल राहून वेगवेगळ्या स्पर्धामध्ये भाग घ्यावा व अपयशाने गांगारून न जाता सतत प्रयात्न करावे.

**ब) शिक्षकांसाठी शिफारशी**

१. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मुक्त स्वातंत्र वातावरणा मध्ये शिकण्याची संधी द्यावी.

२. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना नव नवीन तंत्रांचा व कृतीयुक्त अध्यापन पध्दतीचा वापर करून शिकवावे.

३. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना कृतीयुक्त व कौशल्याधिष्टीत तसेच मनोरंजनात्मक पध्दतीने शिकवावे.

*Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

४. शिक्षकांनी अध्यापनातून विद्यार्थ्यांना उच्च यश मिळविण्यासाठी प्रोत्साहित करावे तसेच आवश्यक ते सकारात्मक कौशल्याधिष्टीत मार्गदर्शन करावे.

५. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शालाबाहय परीक्षांची तसेच कोशल्यात्मक ज्ञान प्राप्तीची माहिती देऊन तयारीसाठी मार्गदर्शन करून शिक्षकांनी विद्यार्थ्यांना अशा प्रकारच्या परीक्षा देण्यासाठी तसेच कोशल्यात्मक ज्ञान प्राप्त करण्यासाठी विद्यार्थ्यांना उत्साही बनवावे व वेळोवेळी मार्गदर्शन करावे

६. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना आवश्यकतेनुसार नियमित मार्गदर्शन करावे.

**क) पालकांसाठी शिफारशी**

१. पालकांनी पाल्याला घरा मध्ये मोकळे व प्रेमळ वातावरण निर्माण करून द्यावे.

२. पालकांनी सर्व पाल्याकडे समानतेने बघावे.

३. पालकांनी पाल्याला चांगल्या जीवनाचे महत्त्व समजून सांगावे.

४. पालकांनी पाल्यांना चांगले कौशल्य आत्मसात करण्यासाठी प्रोत्साहित करावे.

५. पालकांनी पाल्यांना नवीन कार्ये करण्यासाठी व नवीन ज्ञान आत्मसात करण्यासाठी प्रोत्साहित करावे

६. पालकांनी घरामध्ये आनंदी व मोकळे वातावरण निर्माण करावे.

**ड) शाळांसाठी शिफारशी**

१. शाळेमध्ये तंत्रज्ञानाधिष्टीत अध्ययन व अध्यापनाची आवश्यक सोय उपलब्ध असावी.

२. शाळेमध्ये तंत्रज्ञानाचा अध्ययन व अध्यापनात वापर करण्यासाठी शिक्षक व विद्यार्थी प्रशिक्षणाची आवश्यक सोय उपलब्ध असावी.

३. शाळेमध्ये कृती युक्त अध्ययन अध्यापनाची सोय उपलब्ध असावी.

४. शाळेमध्ये कौशल्य विकसनासाठी भौतिक सुविधा उपलब्ध कराव्यात.

५. शाळेमध्ये वार्षिक गुण गौरव समारंभाचे वर्षातून एकदा आयोजन करावे.

६. शाळेमध्ये विद्यार्थ्यांना प्रेरीत करण्यासाठी व त्यांच्या सुप्त गुणांचा विकास करण्यासाठी वेगवेगळ्या विविध शालेय स्पर्धाचे आयोजन करावे.

**पुढील संशोधनासाठी विषय** :

१. शहरी व ग्रामिण भागातील शिक्षकांची संकरित अध्यापनाबाबत जाणीव जागृतीचा तौलनिक अभ्यास.

२. उच्चमाध्यमिक शाळेतील संकरित अध्यापनाबाबत शिक्षकांची जागरूकता व दृष्टीकोन यातील सहसंबंधाचा अभ्यास.

३. प्राथमिक शाळेतील संकरित अध्यापनाबाबत शिक्षकांची जागरूकता व जीवन कौशल्य विकास, मूल्यांचा विकास यातील सहसंबंधाचा अभ्यास.

*Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

४. उच्च माध्यमिक शाळेतील संकरित अध्यापनाबाबत शिक्षकांच्या जागरूकतेचाअभ्यास.

५. माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांची संकरित अध्यापनाबाबत जागरूकता व मानसिक, सामाजिक परिस्थिती यातील सहसंबंधाचा अभ्यास.

**संदर्भ ग्रंथ:**

*जाजू, स. (२००८). परीक्षेत यश मिळणारच ! (प्रथमावृत्ती) पुणेः अनमोल प्रकाशन.*
*पंडित, व. वि. (१९८९). शिक्षणातील संशोधन अभिकल्प (प्रथमावृत्ती) पुणे नूतन प्रकाशन*
*पाटील, वा. भा. (१९९९). संशोधन पध्दती नागपूरः श्री गणेश प्रकाशन.*
*भांडारकर, के.म. (२००५) सुलभ शैक्षणिक संख्याशास्त्र. पुणेः नूतन प्रकाशन.*
*भिंताडे, वि.रा. (१९८९) शैक्षणिक संशोधन पध्दती (प्रथमावृत्ती) पुणेः साकेत प्रकाशन. भिंताडे, वि. रा. (१९९९). शैक्षणिक संशोधन पद्धती (द्वितीयावृत्ती) पुणेः नूतन प्रकाशन.*
*भिंताडे, वि. रा. (२०१०) शैक्षणिक संशोधन पद्धती (चतुर्यावृत्ती) पुणे नूतन प्रकाशन.*
*भांडारकर, के.म. (२००५) सुलभ शैक्षणिक संख्याशास्त्र पुणेः नूतन प्रकाशन.*
*दांडेकर, वा. ना. (१९९७) शैक्षणिक मूल्यमापन व संख्याशास्त्र पुणे विद्या प्रकाशन.*
*दांडेकर, वा.ना. (१९९७) शैक्षणिक मूल्यमापन व संख्याशास्त्र पुणे विद्या प्रकाशन.*
*डॉ. जोशी, भी. रं. (२००७). सामाजिक शास्त्रामधील संज्ञा-सिद्धांताचा स्पष्टीकरणात्मक कोश मानसशास्त्र (प्रथमावृत्ती), पुणे डायमंड पब्लिकेशन्स.*
*डॉ. जोशी, भी. रं. (२००७) सामाजिक शास्त्रामधील संज्ञा-सिद्धांताचा स्पष्टीकरणात्मक कोश समाजशास्त्र (प्रथमावत्ती), पुणे डायमंड पब्लिकेशन्स.*
*Best, J and Kahn, J. (2003). Research in education (7th Ed.). New Delhi: Prentice-Hall*
*Garrett, H. E. (1985). Statistics in Psychology and Education(11th Ed.). Vakil, Feffer and Simsons Ltd.*
*Krishnaswami, O.R. and Ranganathan, M. (2006). New Methodology of research in social Science (7th Ed.) Delhi: Himalaya Publishing House.*
*NCERT, (2006). Sixth survey of Educational Research. Vol-1, (1993-2000).*
*Pandya, S (2010). Educational Research. Delhi: APH Publication.*
*Sharma, R. (1995): Fundamentals of Education research (1st Ed.). Meerut: International Publishing House.*
*Ahuja, Ram. (2006). Research Methods New Delhi: Rawat Publications.*
*Educational Surveys :*
*Buch, M.B. (1978-1983) Third Survey Of Educational Research, New Delhi: NCERT.*
*Buch, M.B. (1983-1988) Fourth Survey Of Educational Research, New Delhi: NCERT*
*Website :*
*http://eduresearch.dauniv.ac.in*
*http://en. Wikipedia.org.*
*www.Cin.org/subject/me.com.*
*www.nmci.org/index.com.*
*www.eric.com.*
*www.wikpedia.org.*
*www.education.nic.in.*
*www.thefeedictionary.com.*
*http//www.ericsearch.org*
*httpÁ//www.memletics.com*

*Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*